# मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस

## यांच्या सरकारचा लेखाजोखा शंभर दिवसांचा....



१०० दिवस प्रगतीचे विश्वासाचे...

१०० दिवस

प्रगतीचे विश्वासाचे...





**श्री देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

मुख्यमंत्री **देवेंद्र फडणवीस** यांच्या नेतृत्त्वातील सरकारला ७ फेब्रुवारी २०१५ रोजी १०० दिवस पूर्ण होत आहेत. या शंभर दिवसांतील सरकारची कामगिरी जनतेपुढे रिपोर्ट कार्डच्या रूपाने सादर करण्याचा हा प्रयत्न. बहुतेक सारे निर्णय यात समाविष्ट करण्यात आले आहेत. एखाद-दुसरी घोषणा असली तरी त्यादृष्टीने पुढाकार आणि नियोजन प्रारंभ करण्यात आल्याने त्याचा येथे अंतर्भाव करण्यात आला आहे.

१०० दिवस प्रगतीचे विश्वासाचे...





**एकनाथराव खडसे**
महसूल, पुनर्वसन, मदतकार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यक विभाग,
कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री



**संजय राठोड**
महसूल राज्यमंत्री



## कृषी

१. विदर्भ आणि मराठवाड्याच्या शाश्वत कृषी विकासासाठी ३४५०० कोटींचा विशेष कार्यक्रम

२. तालुका पातळीवर हवामानाची माहिती देण्यासाठी २००० वेदर स्टेशन्स

३. राज्यातील शेतकऱ्यांना पाच लाख कृषी सौरपंप देण्याबाबत कार्यवाही सुरू

४. राज्यातील प्रमुख नगदी पिकांकरीता कृषि मूल्य साखळयांची (व्हॅल्यूचेन) निर्मीती करणार. १४ पिकांचा समावेश. खाजगी गुंतवणूकदारांमार्फत त्यांचे व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांची क्षमताबांधणी करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश. पहिल्या टप्प्यात १० लाख शेतकरी जोडले जाणार असून पुढच्या टप्प्यात किमान २५ लाख शेतकऱ्यांना जोडले जाईल.

५. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे २१५ कोटींचे वीजबिल सरकार भरणार

६. दुष्काळ भागातील पाच लाख शेतकऱ्यांचे कर्ज माफ

७. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे दहावी/बारावीचे शुल्क माफ

८. शेतकऱ्यांना उसाची किंमत एफआरपीनुसार देण्यासाठी कारखान्यांना सबसिडी देण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा, सकारात्मक निर्णय



## महसूल

१. दुष्काळ निवारणाच्या दीर्घकालीन कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी ७००० कोटी रुपयांच्या पॅकेजचा निर्णय.
(केंद्र सरकारकडून निधी येण्याची वाट न पाहता २००० कोटी आकस्मिकता निधीतून दिले. पंचनाम्याची वाट न पाहत दुष्काळग्रस्त शेतकर्यांना तातडीने मदत.)

२. पीक कर्जाचे पुनर्वसन आणि कर्जमाफी

३. अपूर्ण विहिरी पूर्ण करण्याचा कार्यक्रम

४. आवश्यकतेनुसार टँकर पुरविण्याचे अधिकार तहसिलदारांना

५. खरीप १४ मध्ये ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या २३८११ गावांतील शेतकऱ्यांच्या सावकारी कर्जाची परतफेड शासनाकडून, त्यामुळे ते पुन्हा नव्या कर्जास पात्र

६. भूसंपादन : सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मूल्यमापन करण्यासाठी तज्ञ गट स्थापण्याचा निर्णय

७. ई-म्युटेशन, ई-मोजणी राज्यभरात लागू





**पंकजा मुंडे**
ग्रामविकास, जलसंधारण, रोजगार हमी, महिला आणि बालविकास मंत्री



**गिरीश महाजन**
जलसंपदा मंत्री



**विजय शिवतारे**
जलसंपदा, जलसंधारण राज्यमंत्री



**विद्या ठाकूर**
महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषधी प्रशासन राज्यमंत्री



**दीपक केसरकर**
वित्त, ग्रामविकास राज्यमंत्री

## ग्रामविकास / जलसंधारण / महिला बालविकास









१. दरवर्षी ५ हजार अशी २५००० गावे दुष्काळमुक्त करण्याचे नियोजन (जलयुक्त शिवार अभियानातून पहिल्या वर्षात राज्यातील ५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचे नियोजन. जल आणि मृदसंधारणाच्या माध्यमातून दरवर्षी ५ हजार याप्रमाणे पुढील पाच वर्षात साधारण २५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट).
२. चालू वर्षात राज्यात साधारण १० हजार साखळी बंधारे. या मोहीमेसाठी चालू वर्षात साधारण ६ ते ७ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होईल. राज्य शासनामार्फत विशेष निधी म्हणून १ हजार कोटी रुपयांची तरतूद)
३. यवतमाळ जिल्ह्यातील धरणांतून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी निधी देण्याचा निर्णय
४. सिंचन प्रकल्प वेगाने पूर्णत्त्वास जाण्यासाठी अमरावती विभागातील रिक्त पदे भरली
५. अकोला, वाशीम, बुलढाण्यातील सुमारे १०२ सिंचन प्रकल्प जूनपर्यंत पूर्ण करण्यासाठी नियोजन
६. विदर्भातील ५० टक्के अपूर्ण सिंचन प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन
७. दमनगंगा–पिंजाळ जोडणी प्रकल्पाला मान्यता, मुंबईचा २०६० पर्यंतचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार
८. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजासाठी २५० कोटींचा विकास आराखडा
९. ग्रामीण भागातील अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी एमआरटीपी कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय
१०. बेटी बचाओ–बेटी पढाओ योजनेची अंमलबजावणी सुरू
११. मुख्यमंत्री ग्रामीण रस्ते योजना मंजूर
१२. गाव स्मार्ट व्हिलेजसाठी अपारंपारिक उर्जा, संगणकीकरण, नाविन्यपूर्ण योजनांचा निर्णय
१३. संसद आदर्श ग्राम योजना राबविण्याचा कार्यक्रम सुरू
१४. अधिकार विकेंद्रीकरणाची ग्रामस्तरापर्यंत नेण्याची प्रक्रिया प्रारंभ
१५. वर्षांमध्ये प्रथमच राज्य जल परिषदेची बैठक मुख्यमंत्र्यांनी घेतली. सर्व नदी खोऱ्याचे एकात्मिक जल आराखडे सादर करण्याचे निर्देश
१६. सिंचनाशी संबंधित सर्व कायद्यांचा आढावा घेऊन नियम तयार करण्यासाठी कृतीगट स्थापन करण्याचा निर्णय

## महिला व बालविकास

१. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महाविद्यालयीन विद्यार्थिनी आणि नोकरदार महिलांसाठी अद्ययावत सुविधा असणारी जिजाऊ वसतिगृहे तालुका स्तरावर बांधण्याचा निर्णय.





**सुभाष देसाई**
उद्योग मंत्री



**प्रवीण पोटे**
उद्योग, खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून)





## उद्योग

१. मेक इन महाराष्ट्र
(उद्योग सुरु करण्यास आवश्यक मान्यता/परवाने/संमती मिळविण्याची कार्यपध्दती सोपी.)

२. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती तसेच राज्यातील मंजुरी व ना–हरकती तातडीने देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्तीप्रदान समिती स्थापन.

३. एकात्मिक सोयीसुविधा कक्ष (इंटिग्रेटेड फॅसिलिटेशन सेंटर) मुंबईत स्थापन

४. इझ इन डुईंग बिझनेसच्या दिशेने झटपट पाऊले, व्यवसाय सुरू करणे, बांधकाम परवानगी. उद्योगांच्या सुलभतेसाठी शासनाचाच पुढाकार. ७५ विविध परवानगी कमी करून ती संख्या २५ वर. दोन वर्षांचा कालावधी दोन महिन्यांवर. अल्पावधीतच सर्वस्तरातून स्वागत

५. १०० कोटींपेक्षा अधिकची गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना सिंगल विंडो क्लिअरन्स

६. नागपूरला सिएट प्रकल्पाला अर्ज करण्यापासून ते भूमिपूजनाची प्रक्रिया अवघ्या २३ दिवसांत

७. अमरावती येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या टेक्सटाईल पार्कसाठी पुढाकार, २००० कोटींची गुंतवणूक
(अमरावती येथील टेक्सटाईल पार्कसाठी तीन उद्योजकांना जमिनीचे वाटप करण्यात आले असून, ६ जणांकडून अर्ज प्राप्त झाले आहेत. एकात्मिक वस्त्रोद्योग प्रक्रिया योजनेला चालना देण्यासाठी केंद्र सरकारसोबत वस्त्रोद्योग प्रक्रिया पार्कसाठी अनुदान उपलब्ध करून देण्याचा निर्णय)







८. दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये भरघोस गुंतवणुकीचे फलित
(या परिषदेत महाराष्ट्राच्या सर्व भागात जागतिक गुंतवणूक वाढविण्यासाठीचे प्रयत्न फलदायी. ३० विविध बैठका. प्रामुख्याने डच बँक, जेपी मॉर्गन, नोमुरा फायनान्शियल सर्व्हिसेस, जनरल इलेक्ट्रीक या कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी पसंती दाखविली. जलयुक्त शिवार योजनेस ऑस्ट्रेलियाची मदत; शिंडलर कंपनी एक्सलेटर तयार करण्याचा कारखाना महाराष्ट्रात सुरू करणार; टोरे या जपानी बहुराष्ट्रीय कंपनीस नागपूर/अमरावती येथे जागतिक दर्जाचे एकात्मिक वस्त्रोद्योग पार्क उभारण्यात रुची)

९. मायक्रोसॉफ्ट कंपनी देशातील पहिले दोन मेजर डाटा सेंटर महाराष्ट्रात सुरू करणार. २००० कोटींची गुंतवणूक

१०. राज्यात कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची स्थापना
(यापूर्वीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे नामकरण कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय म्हणून करण्यात आले. राज्यात मोठ्या प्रमाणावर असलेल्या तरुणांना स्वयंरोजगार देण्यासाठी व सुशिक्षित बेरोजगारांना पुरेशा संधी याद्वारे उपलब्ध करून देणार. प्रतिवर्षी २०.६५ लाख कुशल मनुष्यबळ निर्मिती.)

११. ११८०० रोजगार निर्माण करणाऱ्या १२ उद्योगांना परवानगी

१२. एमआयडीसीत उद्योग प्रारंभ करण्यासाठी आता १४ ऐवजी केवळ ५ परवानगी

१३. अकृषी जमिनीचा ५ वर्षांत वापर करणे सक्तीचे

१४. केवळ तांत्रिक कारणामुळे गुंतवणूक थांबल्याने आरआरझेड (नदी नियमन क्षेत्र) धोरण रद्द

१५. एमआयडीसी वसाहतीत उद्योजकांना भराव्या लागणाऱ्या विकास शुल्कात ५० टक्के घट

१६. कर्नाटकात उद्योग स्थलांतरित करण्याची घोषणा करणाऱ्या १०० उद्योजकांचे महत्त्वाचे प्रश्न सोडवून त्यांचे स्थलांतर रोखण्यात यश

१७. कुर्ला येथे युनायटेड किंगडम भारत बिझनेस कौन्सिलचे उद्घाटन
जर्मनीतील बेडन युटेनबर्ग राज्य आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी.
(माहिती तंत्रज्ञान, कौशल्यविकास, वायनरी विकास, पायाभूत सुविधा आदी क्षेत्रात परस्पर सहकार्याचे पर्व सुरू होणार)

१८. माहिती–तंत्रज्ञान विषयक नव्या उद्योग धोरण मसुद्यास अंतिम स्वरूप देण्यापूर्वी त्या क्षेत्रातील उद्योजक व विकासक प्रतिनिधींची परिषद





**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, सामान्य प्रशासन, नगरविकास, गृह, विधी व न्याय, बंदरे, पर्यटन, माहिती-जनसंपर्क, रोजगार-स्वयंरोजगार मंत्री



**डॉ. रणजित पाटील**
गृह, शहरे, नगरविकास, सामान्य प्रशासन, विधी आणि न्याय, संसदीय कार्य राज्यमंत्री





## नगरविकास

१. राजभवनाजवळील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जागतिक दर्जाचे राष्ट्रीय स्मारक, लवकरच भूमिपूजन

२. मुंबईत इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक

३. २०१८ पर्यंत नागपूर मेट्रो प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय, मुख्य इमारतीचा पायाभरणी समारंभ

४. दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो (२५ हजार कोटी) तसेच वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली (१९ हजार कोटी) हे दोन मेट्रो मार्ग आणि चार उड्डाणपुलांना मंजुरी

५. मिहान या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी भूसंपादन आणि सवलतीच्या वीज पुरवठ्यात येणारे अडथळे दूर.

६. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक तसेच नरिमन पॉईंट ते कांदिवली दरम्यान ३६ किमी.च्या किनारी मार्गास (कोस्टल रोड) लवकरच मान्यता देण्याचा निर्णय

७. मुंबईतील चैत्यभूमी परिसराचे कालबद्ध रितीने सुशोभिकरण करणार.

८. मुंबईला जागतिक आर्थिक हब करण्यासाठी ठोस पाऊले. 'मुंबई नेक्स्ट एमएमआर ट्रान्सफॉर्मेशन'चे आयोजन. मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन जागतिक व्यापार केंद्र झाल्यास रोजगार निर्मित्ती, महसूल वृद्धी आणि या क्षेत्राचा विकास

९. नवी मुंबई विमानतळाच्या सर्व परवानगी प्राप्त केल्या. २०१९ पर्यंत कार्यान्वित करणार

१०. स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकासाठी समिती गठीत

११. पर्यटन क्षेत्रात हॉटेल्स, मॉटेल्स, शैक्षणिक संस्था यांच्यासाठी एफएसआयमध्ये विशेष सूट देण्याचा निर्णय घेतला

१२. तीन वर्षांपासून प्रलंबित १८ विकास आराखडे मंजूर

१३. कल्याण-भिवंडी नागरी विकास आराखडा मंजूर

१४. बांधकाम परवानगी ७ दिवसांत मिळेल, असे नियोजन

१५. भेंडी बाजारच्या विकासाला चालना



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, सामान्य प्रशासन, नगरविकास, गृह, विधी व न्याय,
बंदरे, पर्यटन, माहिती–जनसंपर्क, रोजगार–स्वयंरोजगार मंत्री



## सामान्य प्रशासन

१. सेवा हमी कायद्याचा पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय.
(विधेयकाचे प्रारूप नागरिकांना वाचण्यासाठी आणि त्यांच्या सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध केले. या विधेयकामुळे नागरिकांना निश्चित कालमर्यादेत सेवा मिळणार)

२. माहिती अधिकार ऑनलाईन करणारे देशातील पहिले राज्य. यंत्रणा पूर्णत: कार्यान्वित

३. अधिकारांचे विकेंद्रीकरण. अनेक शासकीय विभागातील बदल्यांचे अधिकार मंत्रालयातून काढून विभागीय पातळीवर.
(जलसंपदा खात्यातील बदल्यांचे अधिकार स्थानिक पातळीवर, पोलिस खात्यात सुद्धा बदल्यांचे अधिकार प्रत्येक टप्प्यावरील अधिकाऱ्यांना.)

४. निमशासकीय संस्था आणि मनपा, नपातील सर्व कर्मचाऱ्यांना आपली मालमत्ता जाहीर करणे अनिवार्य करण्याचा निर्णय

५. जात पडताळणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र अतिरिक्त जिल्हाधिकारी



## विधी व न्याय

१. १७९ न्यायाधीशांची पदे भरण्याचा निर्णय



# आपले सरकार










## माहिती तंत्रज्ञान

१. आपले सरकार ई–पोर्टल व मोबाईल अप्लिकेशन कार्यान्वित. २१ दिवसांत समस्येचे निराकरण
(या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण २१ दिवसांत करणे शक्य होणार आहे. प्रारंभी मंत्रालय स्तरावरील कामे यातून होतील. येणाऱ्या काळात विभाग, जिल्हा आणि तालुका पातळीपर्यंत ही प्रणाली जोडली जाणार आहे. यावर नागरिक त्यांच्या सूचना व अभिप्राय देखील कळवू शकतात, त्यातून सरकारच्या निर्णयप्रक्रियेत जनसहभाग वाढेल)

२. तीन लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या खरेदीकरीता ई–निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे सक्तीचे

३. एक लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या लिलावांसाठी ई–लिलाव पध्दतीचा वापर करणे बंधनकारक.

४. शासनाकडून नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तत्परतेने उपलब्ध करून देण्यासाठी यंदाचे वर्ष डिजिटल वर्ष.

५. नागरिकांच्या सुविधेसाठी ८५ ई–गव्हर्नन्स केंद्र सुरू करण्याचा निर्णय

६. ऑनलाईन तिकीट बुक करणाऱ्यांना करमणूक करात सुट
(अम्युझमेंट पार्क, वॉटर पार्क, आयपीएल, आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने इत्यादी)



## राज्य उत्पादन शुल्क

१. चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी करण्याचा निर्णय. जिल्ह्यातील सर्व मद्य परवाने बंद.





**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, सामान्य प्रशासन, नगरविकास, गृह, विधी व न्याय, बंदरे, पर्यटन, माहिती-जनसंपर्क, रोजगार-स्वयंरोजगार मंत्री



**राम शिंदे**
गृह ग्रामीण पणन, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन राज्यमंत्री





## गृह

१. ८०० कोटी रूपये खर्च करून सीसीटीव्ही प्रकल्प मंजूर करून मुंबई/पुणे येथे गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रणाली विकसित करण्याला मान्यता

२. पोलिसांच्या बदल्यांचे अधिकार विकेंद्रीत (जिल्हा, क्षेत्रिय पातळीवर अधिकार प्रदान, कॉन्स्टेबलच्या एका ठिकाणच्या सेवा कालावधीत २ वर्षांहून ५ वर्ष इतकी वाढ)

३. गुन्हे सिद्ध करण्याचा दर जो १६ टक्के होता, तो ५० टक्क्यांवर आणण्यासाठी उपाययोजना (खाजगी वकील नेमण्याचे अधिकार पोलिस आयुक्त/पोलिस अधीक्षकांना, चांगले काम करणाऱ्यांना पारितोषिके तसेच चांगले काम न करणाऱ्यांच्या गोपनीय अहवालात तशी नोंद करण्याचा निर्णय)

४. नाशिक आणि कोल्हापूर येथे नवीन न्यायसहाय्यक प्रयोगशाळा

५. ४५ नव्या न्यायसहाय्यक केंद्र स्थापन करण्याचा निर्णय (पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांच्या प्रत्येकी कक्षेत एक याप्रमाणे)

६. सायबर क्राईम रोखण्यासाठी १००० अधिकार्यांना प्रशिक्षण, विशेष न्यायालये स्थापण्याचा निर्णय

७. सर्व पोलिसांना घरे मिळावी, यासाठी एफएसआय ४ वर वाढविला

८. पोलिसांना सुटीच्या दिवशी काम केल्यास पूर्ण दिवसाचे वेतन देण्याचा निर्णय

९. प्रत्येक पोलिस ठाण्यात महिलांविरूद्धचे गुन्हे रोखण्यासाठी विशेष सेल

१०. ३१ मार्च २०१५ पूर्वी नवीन प्रिझन मॅन्युअल स्वीकारण्याचा निर्णय



## पर्यटन

१. सिंधुदुर्गमधील सीवर्ल्ड प्रकल्पाच्या भूमी अधिग्रहणाला मान्यता, प्रकल्पासाठी उर्वरित निधीही लवकरच देणार, सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनाचा ब्रॅण्ड म्हणून जगभर ओळख देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत विशेष प्रयत्न.






**सुधीर मुनगंटीवार**
वित्त व नियोजन, वन मंत्री



**बबनराव लोणीकर**
पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री



## वित्त व नियोजन, वन विभाग

१. १० हजार कोटी रूपये अतिरिक्त साधनसंपत्तीतून गोळा करून राज्याच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी झेप

२. चंद्रपूर येथील वन प्रशिक्षण संस्थेचा दर्जा वाढवून त्यास वन अकादमीमध्ये रुपांतरीत करण्याचा निर्णय. या वन अकादमीमार्फत वन्यजीव व्यवस्थापन व वानिकी उत्पादन विषयक प्रशिक्षण देणार.

३. सामाजिक वनीकरण व वनविभागाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय. त्यामुळे वनीकरण, वनसंरक्षण व पाणलोट विकासाठी कामे प्रभावीपणे शक्य.

४. चंद्रपूर जिल्हयात बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणार. त्याचा फायदा पारंपारिक कारागिरांना.

५. बुरूड समाजातील कामगारांना करमुक्त व रॉयल्टीमुक्त दराने बांबू देण्याचा निर्णय

६. नागझिरा, नवेगाव, मेळघाट व्याघ्रप्रकल्पासाठी विशेष व्याघ्र संरक्षण दल स्थापन करण्याचा निर्णय



## पशुसंवर्धन / दुग्धव्यवसाय

१. महाराष्ट्र गोवंश हत्याबंदी विधेयक केंद्राकडे सादर, आनुषंगिक माहितीही दिली

२. चारा टंचाईबाबत निरनिराळ्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

३. मुंबईत प्रतिदिन १ लाख लिटर अतिरिक्त दुधाचे नियोजन

४. मासेमारांच्या मुलभूत सोयींसाठी १२० कोटींची योजना मंजूर



## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंअंतर्गत तीन महिन्यात ८०६ गावांना पेयजल सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत (नागपूर पेरी अर्बन पाणीपुरवठा योजनेचे मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, २३२.७४ कोटींची योजना)

२. १०० दिवसात ७३,५९६ शौचालयाचे बांधकाम पुर्ण

३. प्रत्येक ग्रामपंचायतीत एक निर्मलदूताची एक वर्षासाठी निवड

४. गाव समुदाय संचलित हागंदारी मुक्त करण्याचा आराखडा गावाचे मदतीने तयार

५. स्वच्छतेच्या कार्यक्रमास गती आणण्यासाठी स्वच्छता कामांची उभारणी करिता आवश्यक साहित्याच्या पुरवठा

६. २ ऑक्टोंबर, २०१९ पर्यंत महाराष्ट्र हगणदारी मुक्त करण्याचे नियोजित कृती आराखडा तयार





**विनोद तावडे**
शालेय शिक्षण, क्रीडा, युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्यमंत्री



**रवींद्र वायकर**
गृहनिर्माण उच्च आणि तंत्रशिक्षण राज्यमंत्री





## उच्च व तंत्र शिक्षण / वैद्यकीय शिक्षण

१. पुढील शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षणात चॉईस बेस क्रेडिट सिस्टीम (पुढील शैक्षणिक वर्षापासून शिक्षणामध्ये वैकल्पिक निवड तसेच कौशल्य (चॉईस बेस क्रेडिट सिस्टीम) ही योजना सुरु करण्याचा निर्णय. यामुळे विद्यार्थ्यांना आवडीचे शिक्षण घेता येणार, तसेच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन अधिक सोपे होईल.

२. नागपूरमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या (आयआयएम) उभारणीस केंद्राच्या मनुष्यबळ विकास विभागाची मंजूरी. २०१५ पासून कार्यान्वित करणार

३. स्वच्छ भारत अभियानाला संस्थात्मक पातळीवर आणणारे पहिले राज्य. सर्व विद्यापीठांचा घेतला सहभाग

४. सांस्कृतिक कार्यक्रमांचे निवेदन महाविद्यालयीन विद्यार्थी करणार, २१०० रूपये मानधन देण्याचा निर्णय

५. विद्यापीठ अधिनियमात सुधारणेसाठी डॉ. अरुण निगवेकर समिती

६. विद्यापीठ विभाजन सुचविण्यासाठी डॉ. राम तकवाले समिती

७. उच्च शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर समिती

८. दफ्तराचे आझे कमी करण्याबाबत समिती स्थापन

९. दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा मिळण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

१०. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून सर्व शाळांमध्ये उपक्रम राबविण्याचा निर्णय

११. सर्व शाळांमध्ये (प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक) महिलांकरिता तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय

१२. राज्यातील एमएमबीएस, बीडीएस व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे प्रवेश करण्यासाठी घेण्यात येणा-या सामायिक प्रवेश परीक्षेच्या पध्दतीमध्ये बदल, निगेटीव्ह मार्किंग पध्दत रद्द

१३. वैद्यकीय महाविद्यालये व रूग्णालयातील नियुक्त अध्यापकांना विभागीय संवर्ग संरचना व विभाग संवर्ग वाटप नियमावली २०१० तून वगळण्याचा निर्णय





## शालेय शिक्षण

१. शाळा प्रवेशासाठी बालकांचे किमान वय निश्चित
(२०१५-१६ मध्ये ३१ जुलै रोजी वयाची कमीत कमी ६ वर्ष पूर्ण झालेल्या मुलांना पहिल्या वर्गातील प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.)

२. पूर्व प्राथमिक वर्ग व पहिलीच्या आरक्षित २५ टक्के प्रवेशासाठी निकष लागू
(कांही शाळांमध्ये इयत्ता पहिलीची प्रवेशक्षमता भिन्न असल्याचे आढळून आल्यामुळे २५ टक्के प्रवेशप्रक्रियेमध्ये अडचणी येत होत्या. यामध्ये सुसूत्रता आणली. यामुळे दुर्बल घटकातील मुलांना त्याचा फायदा होईल.)

३. सर्व प्राथमिक शिक्षकांकरिता शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे.



## क्रीडा विभाग

१. विवेकानंद युवा व युवती मित्र योजना
(राज्यात युवा मित्र व युवती मित्राची नियुक्ती करण्यात येणार आहे. राज्यातील ३५८ तालुके आणि २४ वॉर्डात ही योजना लागू करण्यात येईल. या योजनेला विवेकानंद युवा मित्र/युवती मित्र योजना म्हणून संबोधण्यात येईल. त्यांना दरमहा तीन हजार आणि पाच हजार रुपये मानधन देण्यात येईल.)




## मराठी भाषा

१. साहित्य संस्कृती मंडळाकडून लेखकांच्या मानधनात वाढ.




चंद्रशेखर बावनकुळे
उर्जा, नवीन व नवीनीकरण उर्जा मंत्री


राजकुमार बडोले
सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री


दिलीप कांबळे
सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री





## ऊर्जा

**राज्याला आवश्यक वीजनिर्मितीमध्ये २०२० पर्यंत स्वयंसिद्ध करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू**

१. पाच लाख सौर उर्जा पंप पुरविण्याचा निर्णय

२. राज्याच्या अपारंपारिक उर्जा धोरणाचा मसुदा तयार, लवकरच जाहीर करणार

३. केंद्राकडे पाठपुरावा करून कोळशाचा प्रश्न सोडविला. १७०० मे.वॅ. उत्पादनासाठी कोळशाची सोय

४. औष्णिक वीज निर्मिती केंद्रांसाठी पुरेसा आणि माफक दरात कोळसा उपलब्ध होण्यासाठी नजीकच्या राज्यातून कोळसा घेण्याचा निर्णय

५. शेतीचा वीज पुरवठा सुरळीत करण्यासह कृषी पंपांना लवकरच जोडणी देणार.

६. भारनियमनाचा कालावधी दोन तासांनी कमी

७. १९ हजार गावांना नियमित आणि पुरेसा वीजपुरवठा करण्यासाठी योजनाबद्ध नियोजन सुरू

८. तिन्ही कंपन्यांवरील एकत्रित कर्जावरील व्याजाचा भार कमी करण्याचा निर्णय

९. सर्व नादुरूस्त ट्रान्सफॉर्मर दुरूस्त केले किंवा नवीन बसविले. त्यामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत केला



## सामाजिक न्याय

१. जात पडताळणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र अप्पर जिल्हाधिकारी

२. सामाजिक न्यायाच्या सर्व योजना थेट लाभार्थींपर्यंत आरटीजीएसने पारदर्शितेने देणार





**चंद्रकांतदादा पाटील**
सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून)



**दादाजी भुसे**
सहकार राज्यमंत्री



**विष्णू सावरा**
आदिवासी विकास मंत्री



**राजे अंबरिशराव राजे सत्यवानराव आत्राम**
आदिवासी विकास राज्यमंत्री



## सहकार / वस्त्रोद्योग

१. वस्त्रोद्योग विकासासाठी विधानसभा सदस्य हाळवणकर यांच्या अध्यक्षतेत समिती स्थापन, शासनाला अहवाल प्राप्त

२. हातमाग उद्योग पुनर्वसनअंतर्गत २.३४ कोटींचे पॅकेज, ४९० विणकरी संस्था, २००० विणकरांना लाभ

३. यंत्रमागाचा दर्जा उंचावण्यासाठी नागपूर, मालेगाव क्लस्टर सोबतच ही योजना इचलकरंजी, सोलापूर, भिवंडी या क्लस्टरसाठी राबविण्याचा निर्णय

४. जैव तंत्रज्ञान आणि सेंद्रिय शेतीचे सुसूत्रिकरण करण्याची योजना. विदर्भ आणि मराठवाडा या दुष्काळी भागात शेतकर्यांच्या उत्पादन खर्चात घट व्हावी यासाठी प्रयत्न.

५. मुंबईतील चार कापड गिरण्यांपैकी तीन अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथे, तर एक गिरणी बार्शी येथे स्थानांतरित करण्याचे निर्देश. कापूस उत्पादक भागात कापड निर्मिती करणार्या गिरण्या असाव्यात त्यामुळे स्थानांतराचा निर्णय. उच्चाधिकार समितीची स्थापना

६. बँकिंग परवाना नसलेल्या नागपूर, वर्धा, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँकांना केंद्राने मंजूर केलेल्या योजनेनुसार, राज्य सरकारकडून २५० कोटी भागभांडवल स्वरूपात मदत

७. कापूस पणन महासंघास ५० कोटी मार्जिनमनी, बँकेकडून नजरगहाण कर्ज घेण्यासाठी २०० कोटींची शासनहमी



## आदिवासी विकास

१. आदिवासींचे कुपोषण, बालमृत्यूचा दर २०१९ पर्यंत सरासरीपेक्षा कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना

२. आदिवासी उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी थेट ग्रामसभांना अधिकार, आर्थिक सक्षमीकरण प्रारंभ





**गिरीश बापट**
अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषधी प्रशासन, संसदीय कार्य मंत्री



**प्रकाश मेहता**
गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री



**विजय देशमुख**
सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री (सार्वजनिक उपक्रमासह)



## अन्न व नागरी पुरवठा

१. अत्यंत पारदर्शकपणे व स्पर्धात्मक पद्धतीने एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि. मार्फत ई–लिलावाद्वारे साखर खरेदी करुन ती दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय लाभार्थ्यांना वितरीत.

२. ट्रॅकिंग ऑफ फूडग्रेनच्या दिशेने प्रारंभिक तयारी पूर्ण, अन्नधान्याच्या बचतीचा मार्ग



## कामगार विभाग

१. कुशल कामगार वर्ग निर्माण करण्यासाठी कामगारांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षणाच्या दृष्टीने प्रामथिक तयारी सुरू.

२. येत्या काळात कामगारांना आधुनिक कौशल्याधिष्ठित बनविण्यासाठी कामगार कायद्यात बदलाचा मसुदा तयार.

३. राज्यात सुमारे साडे तीन कोटी असंघटीत कामगार. त्यांच्यासाठी महाराष्ट्र असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा मंडळाची स्थापना करण्याचा शासनाचा निर्णय.

४. माथाडी कामगार कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर थांबविण्यासाठी कामगार कायद्यात सुधारणा करणार.



## गृहनिर्माण

१. झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील पाच खाजगी विकासकांकडे प्रलंबित असणार्या योजनेखालील जमिनी ताब्यात घेण्याचा निर्णय
(या विकासकांकडील दोन हजार एकरहून अधिक जमिनी ताब्यात घेण्यात येतील व हाऊसिंग स्टॉक निर्माण केला जाईल.)

२. एआरए अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन, धारावी पुनर्विकासाच्या प्रकल्पाला गती





**एकनाथ शिंदे**
सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रमासह)



**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री



## सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

१. राज्यातील पथकर स्थानकांबाबत विचारविनिमयासाठी सी. पी. जोशी समिती स्थापन

२. नागपूर येथील संत्रा मार्केट रेल्वे उड्डाणपूल रामझुला जनतेच्या वाहतुकीसाठी खुला

३. कोल्हापूर पथकराला पर्याय निवडण्यासाठी स्वत:च्या मंत्र्यांच्या अध्यक्षतेत समिती

४. रोड मॅनेजमेंट सिस्टिमसाठी सल्लागाराची नियुक्ती



## परिवहन

१. जयगड पोर्ट कंपनी लि. आणि कोकण रेल्वे यांच्यात ३४ किमीच्या रेल्वे लाईनसाठी सामंजस्य करार प्रादेशिक परिवहन कार्यालयांतील कामे कुठल्याही मध्यस्थाविना, पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी यंत्रणा उभारणार.

२. मुंबई एमएमआरमध्ये पारदर्शक पद्धतीने ७८४३ टॅक्सी परवाने ऑनलाईन लॉटरी पद्धतीने जारी केले

३. मुंबईतील लोकलसाठी अधिक चांगल्या सोयी, अधिक वातानुकूलित डबे केंद्राकडे मागितले

४. ८० बंदरे जलदगतीने पूर्ण करण्याचा निर्णय

५. रेल्वे सुधारणांसाठी एकात्मिक वाहतूक प्राधीकरण स्थापन करण्याचा निर्णय

६. सिंधुदुर्ग येथे प्रवासी टर्मिनलला मान्यता, राज्य शासनाची मंजुरी/केंद्र शासनाकडे प्रस्ताव

७. नागभीड, दौंड, वडसा, देसाईगंज मार्गांना मान्यता

८. औरंगाबाद, नागपूर जेएनपीटी ड्रायपोर्ट





**रामदास कदम**
पर्यावरण मंत्री



**डॉ. दीपक सावंत**
सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री



## पर्यावरण

१. पावसाळ्यापूर्वी मिठीनदी सुशोभिकरण प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय

२. नदीकिनारी असलेली शहरातील महापालिका आणि पालिका यांनी त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकातील २५ टक्के रक्कम घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी वापरण्याचे निर्देश, उल्लंघनासाठी गुन्हे दाखल करणार

३. राज्यातील सर्व उद्योगांनी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारणे आवश्यक करण्याचा निर्णय

४. येत्या दोन महिन्यात नियोजन करण्याच्या सूचना, न केल्यास कडक कारवाईची तंबी

५. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पॉलिथिन बॅग्जचे उत्पादन बंद करण्याचे निर्देश

६. अनधिकृत कत्तलखाने १५ दिवसांत बंद करण्याचे निर्देश



## आरोग्य

१. शिव आरोग्य योजनेचा शुभारंभ
(या योजनेअंतर्गत मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा टेलिकॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील दुर्गम भागात तसेच गरिबांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील रूग्णांना शहरांवर विसंबून रहावे लागणार नाही. टेलिमेडिसीनचीही सोय यात असणार आहे)

२. रक्ताच्या एका बॅगची किंमत १०५० रूपयांवरून ८५० रूपयांवर आणली

३. ऑपरेशन कायापालटचे नियोजन प्रारंभ
(प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालय, जिल्हा रूग्णालय ही आधुनिक यंत्रसामग्री आणि तज्ज्ञांसह सुसज्ज करणार)

४. राज्यात विविध शिबिरांमध्ये १५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया

५. एमडीआर/एक्सडीआर या क्षयरोगांच्या रूग्णांसाठी 'आरोग्यवर्धिनी' कार्यक्रमांचा शुभारंभ. यात रूग्णांना मोफत औषधोपचारासह दिवसातून तीन वेळा सकस आहार

६. मातामृत्यू रोखण्यासाठी गरोदर मातांच्या प्रगतीबाबत (ट्रॅकिंग) विशेष वेळापत्रकाचे नियोजन

७. नवीन कुष्ठरूग्ण शोध मोहीमेची सुरूवात





१०० दिवस
प्रगतीचे
विश्वासाचे...





